# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

४ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०२/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, भद्रावती, सिंदेवाही, पाथरी, राजुरा, कोरपना, टेकामांडवा, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१७** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०३ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **३,६९,४००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# शेंगाव पोलीसांकडुन खुनाचा गुन्हा अवघ्या १२ तासात उघड

पोलीस स्टेशन शेंगाव अंतर्गत मौजा शेंगाव खुर्द येथील भाउराव बोंडकु नन्नावरे वय ५५ रा. शेंगाव यांनी एका महिलेचे शेत मागील दोन वर्षापासुन याने ठेक्याने घेतलेले होते. भाउराव हे त्याशेतातील पिकाची कापणी सुरू असतांना त्यांची रखवालीसुध्दा करीत होता. दिनाक २८/०२/२०१९ रोजी चे रात्रो दरम्यान भाउराव बोंडकु नन्नावरे हा शेतात गेला परंतु बऱ्याच वेळ झाला तरीही तो घरी परत आला नाही, यामुळे त्याचा मुलगा विजय भाउराव नन्नावरे याने शेताकडे जावुन शोध घेतला असता भाउराव हा शेतातील मचानीजवळ रक्तबंबाळ अवस्थेत मिळुन आला. विजय भाउराव नन्नावरे यांचे फिर्यादवरून पोलीस स्टेशन शेंगाव येथे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच खुनाचे गुन्हयाचा उलगडा लावण्यासाठी पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवीत मारेकऱ्याचा शोध घेण्यास सुरूवात केली. इसम नामे १) राजु बळीराम ढोक वय ४०, आणि २) रामकृष्ण मधुकर ढोक वय ४५, दोन्ही रा. शेंगाव खुर्द या संशयीत इसमांची चौकशी करतांना गोपनीय माहिती मिळल्याने त्यांची कसुन चौकशी केली असता आरोपीतांनी गुन्हा कबुली देत मृतक भाउराव हा जादुटोणा करीत असल्याचा संशय घेवुन त्याचा खुन केल्याची कबुली दिली. यावरून वरील नमुद दोन्ही आरोपी इसमांना अटक करण्यात आली आहे. पोलीसांची तत्परता आणि घेतलेले अथक परिश्रम यातुन सदरचा गुन्हा अवघ्या १२ तासातच उघडकीस आला असुन आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा तपसात पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात उपविभागीय अधिकारी चिमुर श्री. प्रशांत परदेशी, यांचे नेतृत्वात पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाख श्री. ओ. जी. कोकाटे, पोलीस स्टेशन वरोरा पोनि श्री. उमेश पाटील, पोलीस स्टेशन शेंगाव सपोनि. श्री. बोरकुटे, परि. पोउपनि जी. एस. तिवारी, पोलीस कर्मचारी मनोहर आमने, अशोक क्षिरसागर, बंडु चौधरी, संतोष जाधव, अतुल कानवटे आणि निकीता रासावार यांनी मोलाची कामगीरी केली आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास चंद्रपुर शहर पोलीसांकडुन ४८ तासात अटक आरोपीकडुन ११ लक्ष रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०२/०३/२०१९ रोजी फिर्यादी नामे राजेश रंगारी रा. अशोकनगर चंद्रपूर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे तक्रार दिली की, त्यांचे घरून कोणीतरी अज्ञात इसमाने सोनेचांदीचे दागीने व रोख रक्कम असा एकुण ५,५०,०००/—रू. चा माल चोरी करून नेला आहे. अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. २२७/२०१९ कलम ४५७,३८० भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला.

दिनांक ०२/०३/२०१९ चे रात्रौगस्त दरम्यान गुन्हे शोध पथक वेगवेगळया दिशेने तपास करीत असतांना त्यांना माहिती मिळाली की, सराईत गुन्हेगार नामे **करण मुन्ना समुंद वय २२ वर्ष, रा. पंचशिल चौक घुटकाळा** हा घटनेच्या रात्री घरी हजर नसुन तो बाहेर कुठेतरी फिरत होता. अशी माहीती मिळताच पोलीस निरीक्षक श्री. भगत व पोलीस स्टॉफ यांना सदर सराईत गुन्हेगारावर संशय आल्याने व आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने पोलीसांनी त्याचा शोध घेवुन त्यास बारकाईने विचारपूस करणे सुरू केले. व त्यांची झडती घेतली तर, त्याचे ताब्यात एक सोन्याचा गोफ वजन १३.८५ ग्रॅम. किं. २६,०००/—रू. व एक जोडी पायल वजन ६७.२० ग्रॅम किं. १,३००/—रू. असा एकुण २७,३००/—रू. चा माल मिळुन आल्याने पोलीसांची खात्री झाली की, नमुद आरोपीनेच घरफोडी केली आहे. त्यावरून पोलीसांनी त्यास विश्वासात घेवून सखोल विचारपूस केली तर त्याने सदर घरफोडी केल्याचे कबुल करून चोरी करून लेदर बॅग मध्ये ठेवलेले दागीने बॅगसहित काढून दिले.

वरील आरोपीस पो. स्टे. चंद्रपूर शहर अप.क्र. २२७/१९ कलम ४५७,३८० भादवी मध्ये दि. ०३/०३/२०१९ रोजी अटक करण्यात आली असुन त्याचा पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आलेला आहे. आरोपीकडुन सोन्याचे मणी मंगळसुत्र, बांगडया, कानातील दागीने, गोफ, अंगठी, डोरले **एकुण वनज ३०५ ग्रॅम किं. ९,७७,०८०/— रू**पयाचे दागीने तसेच चांदीची पायल, जोडवे, चैन असे **२५९ ग्रॅम कि. १०,३६०/— रू.** आणि बेन्टेक्स चे दागीने **३५ तोळे किं. १२,५६०/—रू.** चा माल जप्त करण्यात आला. तसेच स्थानिक गुन्हे शाखा पथक यांनी सुध्दा वरील आरोपीला केलेल्या विचारपुसवरून चंद्रपुर शहर अप.क्र. २१५/१९ कलम ४५७, ३८० भादंवि मधील चांदीचे दागीने २१५ ग्रॅ. किं. ११,०००/—रू व मोबाईल हस्तगत केला आहे.

**नमुद आरोपीकडुन एकुण १०,३३,०००/—रूपयाचा मोठया प्रमाणात चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले आहे.**

त्याचप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने पोलीस स्टेशन भद्रावती अप.क्र. ४१६/२०१७ कलम ३७९ भादंवि मधील चोरीस गेलेली स्प्लेंडर मोटारसायकल किं. ४०,०००/—रू व सोन्याचा गोफ व अंगठी वजन २५ ग्रॅ. किं. ८२,५००/—रू. असा एकुण १,२२,५००/—रू चा मुद्देमाल आरोपी नामे शेख रफीक शेख महेबुब रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर याचे कडुन हस्तगत केला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी डॉ. श्री. महेश्वर रेडडी, पोलीस अधिक्षक चंद्रपुर, श्री मारोती इंगवले, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि. श्री. भगत, सपोनि ठाकूर, सपोनि रहांगडाले व पोलीस पथक पोहवा सुरेश केमेकर, सिध्दार्थ रंगारी, स्वामीदास चालेकर, बेसरकर, वंदीराम पाल, रविंन्द्र मानकर, नापोशि संजय, पाडुरंग, पोकॉ. प्रमोद, सत्यवान, सचिन, उमेश, जितेंन्द्र, तसेच स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ. जी. कोकाटे, पोउपनि मुटेकर, पोउपनि शेख, सफौ. दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, पोहवा महेंद्र भुजाडे, पोशि कुदंनसिंग बावरी, विनोद, प्रफुल यांनी पार पाडली. पुढील तपास सुरू आहे.

**१)जप्त सोने :— ३०५ ग्रॅम ( ३०.५ तोळे) २)जप्त चांदी :— २५९ ग्रॅम (२५.९ तोळे)**
**३)जप्त बेनटेक्स दागीने :— ३५० ग्रॅम (३५ तोळे)**